**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठीच्या महाराष्ट्रातल्या दुसऱ्या बोगद्याचा ब्रेकथ्रू संपन्न
- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठी माघारीची मुदत आज ३ वाजता संपणार
- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं ज्येष्ठ लेखिका डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते सातारा इथं उद्घाटन

आणि

- चीन विरोधात आपल्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्यासाठी संरक्षण सिद्धता वाढवण्याचा तैवानचा निर्णय

**<><><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन च्या माध्यमातून मध्यमवर्गीयांना परवडणाऱ्या दरात प्रवास करण्याची सुविधा मिळेल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. बुलेट ट्रेनसाठीच्या महाराष्ट्रातल्या दुसऱ्या बोगद्याच्या पालघर जिल्ह्यातल्या ब्रेकथ्रू समारंभाला ते आज दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. हा दीड किलोमीटर लांबीचा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान खोदला आहे. महाराष्ट्रातला पहिला बोगदा ठाणे ते बीकेसी दरम्यान असून तो ५ किलोमीटर लांबीचा आहे. या बोगद्याचं खोदकाम सप्टेंबर २०२५ मध्ये पूर्ण झालं होत. मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प ५०८ किलोमीटर लांबीचा असून बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा १५ ऑगस्ट २०२७ रोजी सेवेत रुजू होईल असं ते म्हणाले.

- **- -होल्ड - वैष्णव - -**

- **<><><><><>**

गेल्या वर्षभरात भारताने वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रात निर्णायक टप्पे गाठले. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टरपासून ते अंतराळ संशोधन, अणुउर्जा, खनिज क्षेत्रात भारताने प्रगती केली. तांत्रिक आत्मनिर्भरता हे या वर्षाचं धोरण ठरलं असून विकसित भारताच्या उद्दिष्टाच्या दिशेनं टाकलेलं ते एक महत्त्वाचं पाऊल म्हणावं लागेल. या विषयी सविस्तर माहिती आता ऐकुया...

-------------------व्हीसी----------------------

*(मानवकेंद्रित कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात भारताला एक अग्रणी देश म्हणून स्थापित करण्यासाठी इंडिया एआय मिशनची घोषणा करण्यात आली असून त्यासाठी १० हजार कोटी रुपयांपेक्षा भरीव गुंतवणुकीची घोषणा केली. पुढच्या आर्थिक वर्षासाठी भारताने राष्ट्रीय पातळीवरच्या एआय आधारित पायाभूत सुविधांच्या विस्ताराचं धोरण आखलं आहे. भारताची राष्ट्रीय संगणकीय क्षमता आता ३८ हजार जीपीयूच्या पुढे गेली आहे. सेमीकंडक्टर उत्पादन आता भारताच्या तंत्रज्ञान मोहिमेचा केंद्रबिंदू झालं असून मे महिन्यात भारताने ३ नॅनोमीटर चिपच्या डिझाईनसाठी समर्पित असलेले दोन मोठे प्रकल्प सुरू केले. या चिप्स स्मार्टफोन आणि लॅपटॉपपासून ते उच्च कार्यक्षमता असलेल्या संगणकांपर्यंत जगातल्या सर्वात प्रगत तंत्रज्ञानाचा गाभा आहेत. सेमीकॉन इंडिया २०२५ परिषद देखील यंदा आयोजित करण्यात होती. या परिषदेच्या उद्घाटनावेळी भारताची पहिली स्वदेशी बनावटीची विक्रम ही ३२ बिट्सची चिप प्रधानमंत्र्यांसमोर सादर करण्यात आली. नोव्हेंबर महिन्यात संशोधन विकास आणि नवोपक्रम योजना निधी भारताची संशोधन आणि विकास परिसंस्था मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.)*

**<><><><><>**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केरळचे स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसेवक मन्नाथू पद्मनाभन यांच्या जयंती निमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. मन्नाथू पद्मनाभन हे राष्ट्रीय एकात्मता, समानता आणि सामाजिक समरसतेसाठी आपले आयुष्य वेचणारे द्रष्टे समाजसेवक होते असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनीही समाजमाध्यमवरच्या संदेशांमधून पद्मनाभन यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल सरकारनं २०१० नंतर जारी केलेली इतर मागासवर्गीयांसाठीची प्रमाणपत्रं मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेसाठी ग्राह्य मानली जाणार नाहीत, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. कोलकाता उच्च न्यायालयानं २०१० ते २०२४ दरम्यानची ११३ जमातींची ओबीसी प्रमाणपत्र रद्दबातल ठरवली आहेत, त्यामुळे मतदार यादीच्या मसुद्यातले दावे किंवा हरकतींसाठी ही प्रमाणपत्र वैध मानली जाऊ नयेत, असे निर्देश

आयोगानं दिले आहेत. ओबीसी जमातीचे नागरिक स्वतः पात्र मतदार असले तरी मतदार यादीसाठी ओळखीचा पुरावा किंवा जातीचा दाखला म्हणून अशी रद्दबातल प्रमाणपत्र वापरता येणार नाहीत. असंही आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज दुपारी 3 वाजता संपणार आहे. त्यानंतर ठिकठिकाणचं  लढतींचं चित्र स्पष्ट होईल. अनेक ठिकाणी बंडखोरानी माघार घ्यावी याकरता विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचे प्रयत्न सुरु आहेत.  अनेक ठिकाणी  उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान तर 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज सातारा इथं ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झालं. दलित साहित्य हा मराठी साहित्यविश्वाचा आत्मा असल्याची भावना त्यांनी उद्घाटनपर भाषणात व्यक्त केली. संमेलनाच्या अध्यक्षपदाची सूत्रं ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी मावळत्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्याकडून स्वीकारली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

पहिलीपासून हिंदी किंवा अन्य भारतीय भाषा शिकवण्याच्या निर्णयाला साहित्यिक जगताचा विरोध असल्याची भूमिका, मावळत्या अध्यक्ष तारा भवाळकर यांनी तसंच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सचिव मिलिंद जोशी यांनी मांडली, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीला पुरेसा निधी मिळावा अशी मागणी त्यांनी मांडली.

<><><><><>

चीनच्या विस्तारवादी आकांक्षांच्या विरोधात तैवानने आपल्या सार्वभौमत्वाच रक्षण करण्यासाठी संरक्षणसिद्धता वाढवण्याचा निश्चय केल्याचं तैवानच्या अध्यक्ष लाई चिंग ते यांनी म्हटलं आहे. चीनने आपल्या लष्करी सरावादरम्यान तैवानच्या दिशेने काही रॉकेट सोडल्याच्या घटनेनंतर त्यांनी हे विधान केलं आहे. चीनच्या या कृतीमुळे तैवान आणि त्याच्या आसपासच्या  भागात विनाकारण तणाव वाढत असल्याचं अमेरिकन सरकारने

म्हटलं आहे. तैवान हा लोकशाही देश असून चीनने त्यावर लष्करी दबाव टाकू नये असं आवाहन अमेरिकेने केलं आहे.

<><><><><>

चेन्नई बंदरात होणाऱ्या ११व्या भारत आंतरराष्ट्रीय युवक नौकानयन अजिंक्यपद स्पर्धेचं काल उदघाटन झालं. या स्पर्धेला ४ जानेवारीपासून सुरुवात होणार असून त्यासाठी १३ देशांमधून ११७ स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. स्पर्धेच्या अधिकृत यु ट्यूब वाहिनीवर सर्व शर्यतींच थेट प्रक्षेपण पाहता येईल.

<><><><><>

देशाच्या विविध भागात थंडीचा कडाका वाढला आहे. जम्मू काश्मीरमधे गेले ४० दिवस सर्वात कमी तापमानाच्या नोंदी झाल्या आहेत. थंडी आणि बर्फात खेळण्याचा आनंद लुटण्यासाठी काश्मीरमधल्या सोनमर्ग, गुलमर्ग या प्रसिद्ध पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी झाली आहे.

हिमाचल प्रदेशातही डोंगराळ भागात हिमवृष्टी आणि पावसामुळे तापमापकातला पारा घसरला आहे. मात्र येत्या सोमवारपर्यंत वातावरण स्वच्छ सूर्यप्रकाशयुक्त राहील असा हवामानविभागाचा अंदाज आहे. दिल्ली, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, सिक्कीम, आणि बिहारमधे थंडीची लाट आणि दाट धुक्याचं वातावरण राहील. तमिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकलमधे मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

देशाच्या उत्तर भागात दाट धुक्यामुळे दृष्यमानता कमी झाल्याने रेल्वे आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दिल्लीच्या हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झालेली नाही.

<><><><><>

घरगुती ग्राहकांसाठी स्वयंपाकाच्या गॅसच्या दारात कोणतेही बदल झाले नसल्याचं तेल आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. व्यावसायिक वापरासाठीच्या एल पीजी सिलिंडर्सच्या किमतींमध्ये एकशे अकरा रुपयांची वाढ झाली आहे, त्यामुळे घरगुती ग्राहकांनाही वाढीव किंमत द्यावी लागणार, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यावर विश्वास न ठेवण्याचं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

//<><><><><>//